ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, ५ मे, १९७१ | अंक ९

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्टयामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि; उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २

STUSA 738

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी | दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

## KIRLOSKAR PNEUMATIC CO. LTD.,

**Hadapsar Industrial Estate, Poona–13.**

*Offices At :*

BOMBAY, CALCUTTA, DELHI, MADRAS, AHMEDABAD, BANGALORE, BHOPAL, BHUBANESHWAR, COCHIN, INDORE, JAIPUR, LUCKNOW, SECUNDERABAD.

*Manufacturer Of :*

**AIR POWER :** Portable, Rotary, Compressors 3·39 to 16. 99$M^3$/min. ( 120 to 600 c. f. m. ) Stationary, Reciprocating, compressors 0·5 to 28, 5$M^3$/min. ( 1·7 to 1300 cfm. ), oilfree Carbon Ring Compressors. Accessories, Aftercoolers, Receivers, Filters, Silencers, etc.

Rock Drills, Road Breakers, Vibrators, Picks, Rammers, Sump Pump for Civil Engineering; Rivetting/Chipping Hammers, Drills, Grinders for Metal working; Drills, Grinders, Rammers for Foundry Work.

**REFRIGERATION & AIR CONDITIONING.** Refrigeration Compressors, Open Type– 3 to 72 Tonnes Ice Producing Capacity per 24 Hours, 5 to 325 TR Air Conditiouing Capacity. Semi Sealed type 5 and 7·5 TR Air Conditioning Capacity Stop Valves– Suitable for refrigerants and other gases. Himagauri Refrigerated Van Equipment; Rail Refrigerated Van and Rail Coach Air Conditioning Equipment; Bus Air Conditioning Equipment, 1. 3, 5 and 10 Tonnes Capacity Flake/Pack/Slush Ice Machines– Turn Key Jobs in Air Conditioning and Refrigeration,

**POWER TRANSMISSION.** Hydraulic torque converters upto 800 HP, Marine Gears upto 500 HP. Transmission Gear Boxes and Final Drives upto 600 HP. for Locomotives, Earthmoving Equipment, Tractors, Fork Lift Trucks, Cranes, etc.

☆ **अर्थ** ☆

बुधवार, ५ मे, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

### अमेरिकेतील वित्तीय संघटनांचा पाकिस्तानला नकार

पूर्व बंगालमधील घटना हा सर्वस्वी पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे असे पाकिस्तानचे म्हणणे आहे. अमेरिका हा देश पाकिस्तानला मदत देणाऱ्या देशांपैकी सर्वांत महत्त्वाचा देश आहे, तेव्हा अमेरिकेच्या प्रस्तुत प्रकरणाच्या धोरणाला साहजिकच परिणामकारक महत्त्व आलेले आहे. पूर्व बंगालमधील घटना पाकिस्तानच्या अंतर्गत घडामोडी आहेत हे म्हणणे अमेरिकेने बऱ्याच प्रमाणात मान्य केलेले असले तरी तेथील वित्तीय संघटना पाकिस्तानवर हळूहळू आर्थिक दडपण आणू लागल्या आहेत. पूर्व पाकिस्तानात लढाई सुरू झाल्यापासून पाकिस्तानच्या परदेशीय चलनाचा साठा झपाट्याने खाली जाऊ लागला आहे. त्यामुळे चिंताग्रस्त होऊन पाकिस्तान सरकारने काही अमेरिकन बँकांना अशी विनंती केली होती, की त्यांनी न्यूयॉर्क येथील स्टेट बँक ऑफ पाकिस्तानमध्ये तात्पुरत्या ठेवी ठेवाव्या. ह्या ठेवीवर भारी दराने व्याज देण्याचीही तयारी दाखविण्यात आली होती. परंतु ह्या आकर्षणाचा काही उपयोग झाला नाही. कोणत्याही बँकेने अशा रीताने पैसे देण्याची तयारी दाखवली नाही. ह्यापूर्वी पाकिस्तानने जागतिक बँकेकडे व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे परदेशीय चलन मिळविण्याचे प्रयत्न केले होते. परंतु ह्या संघटनांनी विरोध दर्शविल्यामुळे पाकिस्तानला अमेरिकन बँकांमार्फत परदेशीय हुंडणावळ मिळविण्याचे प्रयत्न करावे लागले. पाकिस्तानकडून जागतिक बँकेला कर्जाची काही परतफेड व्हावयाची आहे. ह्या परतफेडीला मुदत द्यावी अशीही मागणी पाकिस्तानने केली होती. परंतु बँकेने ती धुडकावून लावली आहे. त्याशिवाय पाकिस्तानला मदत देणाऱ्या इतर धनको राष्ट्रांकडे जागतिक बँकेने कर्जाची मुदत वाढवून देण्यासाठी शब्द टाकावा ही पाकिस्तानची विनंतीही अमान्य झाली आहे. अखेर, पाकिस्तानला आपल्या रुपयाचे अवमूल्यन करावे लागले आहे.

---

### जमीनधारणेची सध्याची मर्यादा बरोबर नाही

मध्यवर्ती जमीन सुधारणा कमिटीची पहिली बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती. कमिटीच्या पहिल्या बैठकीचे उद्घाटन करताना मध्यवर्ती सरकारचे अन्न व शेतकीमंत्री श्री. फक्रुद्दिन अली महंमद म्हणाले, की जमीनधारणेच्या बाबतीत घालण्यात आलेली जास्तीत जास्त मर्यादा बहुतेक राज्यांतून बाजवीपेक्षा अधिक आहे. ती खाली आणणे जरुरीचे आहे. ही मर्यादा खाली आणण्यास तातडीची अशी सामाजिक कारणे तर आहेतच; पण केवळ अर्थशास्त्रीय दृष्टीने पाहिले तरीसुद्धा कमाल जमीनधारणेच्या सध्याच्या स्थितीचे समर्थन करता येणार नाही. जमीनधारणेची कमाल मर्यादा खाली आणली तर ग्रामीण भागातील सुशिक्षित शेतकरी शेती करण्याचे सोडून देईल अशी भीती व्यक्त करण्यात आलेली आहे. पण हा युक्तिवाद बरोबर नाही. कमाल जमीनधारणेची मर्यादा खाली आणण्यात आली तरीसुद्धा ती इतकी असेल की सुशिक्षित शेतकऱ्यांना शेतीकडे आकृष्ट करण्यास ती पुरेशी होईल. शेतीच्या मालाला किमतीची हमी देण्यात येते. त्याचबरोबर पाणीपुरवठ्याच्या सोयीही वाढविण्यात येत आहेत. पाणीपुरवठ्याच्या सोयींतील वाढ आणि तांत्रिक साधनांचा वापर ह्यांच्यामुळे लहान शेतजमिनींतूनसुद्धा उत्पन्न वाढविणे शक्य झालेले आहे. अर्थातच जमीनधारणेची कमाल मर्यादा उतरविण्यामुळे उत्पन्नात घट होईल ही भीती निराधार म्हणावी लागते. ग्रामीण व शहरी भागांतील आर्थिक विषमतेची दखल घेऊन शेतजमिनीच्या धारणेचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिक कुटुंबांना शेतजमीन मिळेल हे तर खरेच पण त्याशिवाय आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या शेतजमिनीचे तुकडेही कमी होतील.

---

### तामीळनाडूला जागतिक बँकेचे कर्ज

तामीळ नाडूमधील भू-विकासाच्या खास योजनेसाठी जागतिक बँकेने ३३·२६ कोटी रुपयांचे कर्ज देण्याची तयारी दाखवली आहे. कर्जाच्या वाटाघाटी करण्यासाठी लवकरच एक प्रतिनिधी-मंडळ अमेरिकेला रवाना होत आहे. त्यात तामीळनाडू को-ऑपरेटिव्ह स्टेट लँड डेव्हलपमेंट बँक, राज्य व मध्यवर्ती सरकार आणि ॲग्रिकल्चरल फायनॅन्स कॉर्पोरेशन ह्यांचे प्रतिनिधी असतील. तामीळनाडू सरकारने मूळ ७२ कोटी रुपये खर्च येणारी योजना आखली होती. परंतु बँकेने तिची काटछाट केली आहे. पाटबंधाऱ्यांच्या छोट्या योजना, शेतीचे यांत्रिकीकरण आणि जमीन सुधारणा ह्या कामासाठी कर्जाचा विनियोग करण्यात यावयाचा आहे. शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरसाठी द्यावयाच्या किमतीपैकी किती किंमत रोखीने द्यावी ह्याविषयी वाटाघाटी व्हावयाच्या आहेत. त्याबद्दल वाद आहे.

---

### जनगणनेच्या बिनचूकपणाबद्दल शंका

नुकत्याच करण्यात आलेल्या शिरगणतीत भारताची लोकसंख्या ५४·७ कोटीच्या घरांत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. शिरगणतीचे काम हे इतके अवाढव्य व गुंतागुंतीचे आहे की त्यात शंभर टक्के बिनचूकपणा असणे शक्यच नसते. ह्यासंबंधी बडोदा येथील डेमोक्रॅटिक रिसर्च सेंटरचे श्री. एम. एम. गंडोत्रा ह्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की शिरगणती-प्रमुखांनी भारताची लोकसंख्या ५४·७ कोटी असल्याचे जाहीर केले असले तरी हा अंदाज तितकासा बरोबर म्हणता येणार नाही. भारतामधील लोकसंख्येच्या वाढीची वार्षिक गती लक्षात घेता १९७१ मधील भारताची लोकसंख्या ५६·६ कोटीच्या घरात असणे अधिक बरोबर वाटते. ह्या प्रश्नाचा विचार करताना दर हजारी मृत्यूचे प्रमाण आणि जननाचे प्रमाण लक्षात घ्यावयास पाहिजे. गेल्या दशकात मृत्यूचे प्रमाण १९ टक्क्यांपर्यंत खाली आलेले आहे. त्याचप्रमाणे जननाचे प्रमाण ४१·७ टक्क्यांवरून ३८·३ टक्क्यांपर्यंत खाली आलेले आहे. १९६१ मध्ये लोकसंख्येच्या वाढीचा जो अंदाज करण्यात आला होता, त्यापेक्षा १९७१ मध्ये करण्यात आलेला अंदाज तौलनिक दृष्ट्या अधिक असणार हे उघड आहे अर्थातच भारताची लोकसंख्या ५६·६ कोटींच्या जवळपास असणे अधिक संभवनीय वाटते. शिवाय शिरगणती कचेरीने जाहीर केलेले तात्पुरते आकडे पुन्हा तपासण्यात आलेले नाहीत. तेव्हा १९७१ मधील लोकसंख्येचा अंदाज जाहीर केलेल्यापेक्षा अधिक असलाच पाहिजे.

---

### विमान प्रवासाच्या नव्या युगाचा प्रारंभ

एअर इंडिआ ह्या आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक करणाऱ्या भारताच्या कंपनीने विमानप्रवासातील नव्या युगाला प्रारंभ केला आहे. कंपनीचे पहिले ७४७ बोइंग जेट विमान नुकतेच मुंबईला आले आहे. ह्या प्रकारच्या विमानामुळे प्रवाशांच्या वाहतुकीत अडीच पटीने वाढ करणे शक्य होणार आहे. तथापि नव्या विमानांच्या आगमनामुळे एअर इंडिआला काही काळ अडचणीत काढावा लागणार आहे. १९६० मध्ये पिस्टनच्या साह्याने चालणाऱ्या सुपर कॉन्स्टेलेशन जातीच्या विमानाऐवजी जेटवर चालणारी ७०७ बोइंग विमाने वापरण्यात येऊ लागली. त्यावेळी जशा अडचणी आल्या तशाच काहीशा ह्या वेळी निस्तराव्या लागणार आहेत. १९६० साली नव्या जातीच्या विमानांची वाहतूक सुरू करण्यासाठी सुमारे ४४·०२ कोटी रुपयांचा खर्च येणार होता. ह्या खर्चापैकी सुमारे १० कोटी रुपयांचे कर्जाचे हप्ते एअर इंडिआने अजूनही द्यावयाचे आहेत. आता पुन्हा बोइंग ७४७ जातीची विमाने वापरण्यास प्रारंभ करण्यात येत आहे. अशा प्रकारची ४ विमाने कंपनी वाहतुकीसाठी घेणार आहे. प्रवाशांची मोठ्या संख्येने ने-आण करणे त्यामुळे शक्य होणार असले तरी त्यासाठी १०३ कोटी रुपये खर्च येणार आहे. ७४७ बोइंग विमानाचे वजन ७ लाख, ७५ हजार पौंड इतके आहे. एका विमानात ३७४ प्रवासी बसण्याची सोय असून ते कोठेही न थांबता ६,६०० मैलांचा प्रवास करू शकेल. त्याचा दर तासाचा वेग ६२५ मैल आहे. विमानात ३२ पहिल्या वर्गाच्या व ३२१ साध्या जागा आहेत.

---

### साखरेची निर्मिती प्रथम भारतात

साखर तयार करण्याची कृती प्राचीन भारतात प्रथम उदयास आली, अशी माहिती अमेरिकेच्या शेतकी खात्यातील संशोधकांनी उपलब्ध केली आहे. खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका प्रकाशनात साखरेसंबंधीच्या बाजारपेठेची माहिती देण्यात आली आहे. संशोधक म्हणतात, की उसाची लागवड पहिल्या प्रथम दक्षिण पॅसिफिक महासागरातील बेटात करण्यात आली. परंतु त्यापासून साखर बनविण्याचे तंत्र मात्र भारतातच उदय पावले. तोपर्यंत उसापासून साखर बनविण्याची कृती जगाला माहीत नव्हती. उसापासून साखर बनविण्यात येऊ लागलेल्या काळाची अचूक माहिती नसली तरी एका अधिकारी अभ्यासकाच्या मताने खिस्त शकापूर्वी सुमारे ४००वर्षे उसापासून साखर बनविण्यात आली असावी. त्या सुमारास साखरेसंबंधीची माहिती सर्व भारतात पसरलेली होती. भारतामधून मग साखर तयार करण्याची कला इराणात प्रसृत झाली आणि तेथून पश्चिम आशिआ, इजिप्त, ह्या भूभागांत पसरली. तेथून उत्तर आफ्रिकेतील देशात तिचा प्रसार झाला. मग दक्षिण युरोपातही साखरेची माहिती प्रसृत झाली. तथापि ह्या माहितीचा प्रसार होण्यास शतकानुशतके काल लागला. मध्यंतरी २ हजार वर्षे तर तशीच गेली. भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यालगतच्या देशात उसाची शेती आणि त्यापासून साखरेची निर्मिती करण्याची माहिती होण्यास सातवे व आठवे शतक उजाडावे लागले. उत्तर आफ्रिका आणि स्पेन ह्यांच्यावर मुसलमानांचे आक्रमण होऊन तो भाग त्यांच्या अमलाखाली आला तेव्हा त्यांनी साखरेचा प्रसार तेथे केला. तेव्हा साखर खाणाऱ्यांनी भारताचे ऋणी असले पाहिजे.

---

### जपानचे जननसंख्येचे प्रमाण फार घटले

जपानला आपली आर्थिक भरभराट चालू ठेवण्यासाठी कुशल कामगारांची गरज आहे. परंतु तेथील गर्भपाताच्या कायद्यामुळे आणि संततिनियमनाच्या प्रसारामुळे जननाचे प्रमाण घटले आहे. १९५७ साली जपानमधील लोकसंख्या स्थिर होईल अशी अपेक्षा लोकसंख्या-तज्ज्ञ करीत होते. परंतु जननाची संख्या प्रमाणाबाहेर घटल्यामुळे १० वर्षांनंतरही तसे झालेले दिसून येत नाही. लोकसंख्या स्थिर राहण्यासाठी जननाचे जे प्रमाण असावे लागते त्याहीपेक्षा ते खाली गेलेले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत असे घडल्याची उदाहरणे युरोप आणि अमेरिकेतही दिसून येतात. परंतु सतत १० वर्षे असाच प्रकार चालू राहणे फारच क्वचित् दिसून येते. १९५० ते १९५७ ह्या कालांत जपानमधील जननाचे प्रमाण फार वेगाने घसरले.

# साकार झालेले मनोरथ

## तीन तपे जोपासलेल्या परंपरेचा शेवट

३६ वर्षांपूर्वी बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या कल्पनेचा जन्म झाला आणि ३५ वर्षांपूर्वी ती प्रत्यक्ष अस्तित्वात आली. बँकेच्या प्रवर्तकांनी त्या वेळी जी स्वप्ने मनात बाळगून बँकेचा पाया भक्कम रचला, ती स्वप्ने प्रत्यक्षात उतरली गेली, हे बँकेच्या प्रगतीचे सिंहावलोकन स्पष्ट करून दाखविते. बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर उरलेल्या बँकिंग कंपनीचे स्वस्तिकमध्ये विलिनीकरण होण्याचे आता एकमताने ठरले आहे. अशा रीतीने दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. विराम पावत आहे. बँकेचे प्रवर्तक, ध्येयवादी परंतु तितकेच कुशल आणि लायक संचालक, बँकेच्या भूमिकेशी समरस झालेला अधिकारी वर्ग, ह्या सर्वांना ह्या अखेरीच्या वेळी कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत असणार, हे स्वाभाविक आहे.

बँकेच्या स्थापनेच्या वेळेची थोडीशी हकीकत येथे दिली आहे तीवरून बँकेच्या प्रवर्तकांच्या दूरदृष्टीची कल्पना येईल.

### " बँकेची जरूरी आहेः योजना करावी "

मराठा चेंबर तर्फे भरविण्यात आलेले मराठा व्यापारी व कारखानदार परिषदेचे पहिले अधिवेशन ता. १६ व ता. १७ फेब्रुवारी, १९३५ रोजी पुणे येथे पार पडले. महाराष्ट्रातील व्यापार व उद्योगधंदे यांस खेळत्या भांडवलाचा पुरवठा करण्यासाठी संयुक्त भांडवालाच्या बँकेची जरूरी आहे. त्यासाठी चेंबरने योजना करावी व त्या कामी व्यापाऱ्यांनी साहाय्य करावे, अशी शिफारस एका ठरावाच्या द्वारा परिषदेने केली.

### पूर्वतयारी झाली

"दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. या नावाची एक व्यापारी बँक पुणे येथे काढण्याचे ठरले असून तत्संबंधी बहुतेक सर्व पूर्वतयारी झालेली आहे. सदर बँकेत मॅनेजरचे काम करण्याकरिता बँकिंगच्या धंद्यातील अनुभवी गृहस्थाची नेमणूक करावयाची आहे. सदर गृहस्थ जी. डी. ए. ची अगर बी. कॉम. ची अगर इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा व त्याने कोणत्या तरी मोठ्या व्यापारी बँकेत मुख्य कचेरीत जबाबदारीच्या जागेवर अगर शाखा बँकेचे व्यवस्थापक म्हणून काम केलेले असावे. नवीन बँक नावारूपाला आणण्याविषयी आत्मविश्वास असणाऱ्या लायक गृहस्थांनी शिफारसपत्रासह किमान पगाराची अपेक्षा नमूद करून ता. १ ऑगस्ट, १९३५ पूर्वी अर्ज करावेत " अशी जाहिरात मराठा चेंबरच्या सेक्रेटरीनी जुलै, १९३५ मध्ये प्रसिद्ध केली.

### बँकेचा जाहीरनामा

बँकेची रीतसर स्थापना होऊन ऑक्टोबर, १९३५ मध्ये तिचा प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध झाला. " अल्प प्रमाणावर प्रारंभ करून धिमे धिमे आपले क्षेत्र महाराष्ट्रभर वाढविण्याचा व योग्य संधी मिळताच महाराष्ट्राबाहेरही ते पसरविण्याचा बँकेचा विचार आहे. बँक हरतऱ्हेने जनतेची सेवा करणार असून सुरक्षितता व कार्यक्षमता यांस कोणत्याही प्रकारे बाध येऊ न देता व्यापार उदिमास शक्य ते साहाय्य करील. व्यवहार सुरक्षित व चोख ठेवून ती फायदेशीर रीतीने चालविण्यास लायक अशा मंडळींकडे बँकेचे संचालकत्व व व्यवस्था सोपविण्यात आली आहे. " असे त्या प्रॉस्पेक्टसमध्ये म्हटले होते.

पहिल्या संचालक मंडळात खालील गृहस्थ होते.

(१) प्रो. वा. गो. काळे ( अध्यक्ष )
(२) श्री. डी. के. साठे (उपाध्यक्ष )
(३) श्री. बी. एम. गुप्ते
(४) श्री. एन. जी. पवार
(५) श्री. टी. व्ही. रानडे
(६) श्री. व्ही. पी. वर्दे ( मुंबई )
(७) श्री. एम. आर. जोशी
(८) श्री. एस. जी. मराठे
(९) श्री. आर. सी. सोहोनी

### बँकेचे उद्घाटन : प्रो. काळे ह्यांचे आश्वासन आणि आवाहन

बँकेचे उद्घाटन शनिवार, दि. ८ फेब्रुवारी, १९३६ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, सर सोराबजी पोचखानवाला, ह्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी बँकेचे चेअरमन, प्रोफेसर वा. गो. काळे आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले, " औद्योगिक, व्यापारी व बँकिंगच्या संस्था स्थापन करण्यात मुंबईने पुढाकार घेतला आहे. मुंबईतील बँकांनी परप्रांतात शाखा उघडल्या आहेत, तरी स्वतःच्या इलाख्यात शाखा उघडण्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. मराठी जिल्ह्यात महाराष्ट्रीय अशी एकही मोठी बँक आज अस्तित्वात नाही आणि असल्या संस्थेची जागा मुंबईच्या बँकांच्या शाखांनी भरून निघणे अशक्य आहे. शहरे व जानपद प्रदेश ह्यांची व्यापाराची साखळी जोडण्याचे काम अगत्याचे असून ते हाती घेण्याचा आमच्या बँकेचा उद्देश आहे. स्थैर्य व सुरक्षितता यांवर बँकिंग व्यवसायाचे यश अवलंबून असते. बँका काढण्याच्या बाबतीतील उत्साहातिरेकामुळे या दोन मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष केले जाण्याचा जसा संभव आहे, त्याचप्रमाणे पूर्वी बँकांच्या बाबतीत आलेल्या अपयशाच्या आठवणीमुळे पुनः बँकांच्या व्यवसायाकडे फिरकू नये, असा भेकडपणा व बेफिकिरी उत्पन्न होण्याही धोका आहे. परिस्थितीची शक्यता व लोकांच्या गरजा विचारात घेऊन आम्ही आमचा व्याप वाढवू व जरूरीप्रमाणे महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही शाखा उघडून वा अन्य तऱ्हेने आम्ही आमचे संबंध जोडू. व्यापारी वर्गाच्या सहकार्याने व जनतेच्या सक्रिय सहानुभूतीने लवकरच इच्छित यश संपादन करण्याची आम्हांस उमेद वाटत आहे. पुणे येथील

मराठा चेंबर या संस्थेने ह्या बँकेची कल्पना काढली, बँक काढण्याच्या शक्याशक्यतेचा विचार केला, ऋणानुबंधी मंडळींची सहानुभूती मिळविली व बँक स्थापनेकरता ज्या ज्या प्रकारची पूर्व तयारी करावी लागते, ती ती सर्व केली. या प्रसंगाने बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी चेंबरचे आभार मानतो. "( प्रोफेसर काळे हे त्यावेळी चेंबरचे कार्याध्यक्ष आणि श्री. आ. रा. भट व श्री. गो. द. आपटे हे ऑनररी सेक्रेटरी होते. )

### सर पोचखानवाला ह्यांचा विश्वास

सर सोराबजी पोचखानवाला आपल्या भाषणात म्हणाले, "सध्याच्या व पुढे निघणाऱ्या बँकांनी ( १ ) अप्रामाणिक मार्गाचे अवलंबन व ( २ ) सट्टेबाजी ह्या दोन धोक्याच्या मार्गापासून दूर रहाणे जरूर आहे; हीच दोन कारणे बँकांच्या नाशास मागे कारणीभूत झालेली आहेत. महाराष्ट्र बँकेचे अधिकारी आपली समाजहितसंबंधाची जबाबदारी पूर्णपणे ओळखतात, ह्याबद्दल माझी खात्री आहे व आताच निर्दिष्ट केलेल्या अडचणी ते टाळतील, ह्याबद्दल मला शंका नाही. महाराष्ट्राबाहेर शाखा स्थापन करण्यापेक्षा महत्त्वाच्या खेड्यातून उपशाखा त्यांनी उघडाव्यात असे मी सुचवितो. ह्या नव्या बँकेस जनतेकडून सहकार्य व पाठिंबा मिळेल, अशी मला खात्री वाटते."

### पहिल्या वर्षातील काम

एका वर्षातच बँकेचे १ लक्ष, ४३ हजार रु. चे रोख भांडवल जमून ७ लाखांवर ठेवी आल्या. वर्षअखेर बँकेस ६२५ रु. नफा झाला, त्याचा विनियोग रिझर्व्ह व प्राथमिक खर्च ह्या हिशेबी करण्यात आला.

---

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. मध्ये विलिनीकरण–ठरावास दोन्ही कंपन्यांची मान्यता

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडच्या भागधारकांची तहकूब सभा मंगळवार दिनांक २७ एप्रिल, १९७१ रोजी गोखले हॉल, लक्ष्मी रोड, पुणे येथे झाली. ह्या सभेमध्ये दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचे स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. मध्ये विलिनीकरण संबंधीचा ठराव एकमताने संमत झाला.

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. च्या भागीदारांच्या दि. २९ एप्रिलच्या सभेनेही विलिनीकरणाच्या योजनेला एकमताने मान्यता दिली. १ जुलै, १९७१ पासून ही योजना कार्यवाहीत येईल. हायकोर्टाची मंजुरी मिळताच पुढील तजवीज सुरू होईल.

---

### आयातीवर निर्बंध

परदेशीय हुंडणावळीचा साठा घसरत चालल्यामुळे पकिस्तानने ४६ वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. त्यात टेलिव्हिजन सेट्स, रेफ्रिजरेटर्स, दाढीची पाती, इत्यादी वस्तूंचा समावेश आहे. त्याशिवाय पेट्रोल, वंगणाचे तेल, औषधे इत्यादी वस्तूंवरील आयात कर वाढवून त्या महाग करण्यात आल्या आहेत.







# पुणे शहरातील उद्योगपतींची समाजहिताची कामगिरी

( चंद्रकांत शं. किर्लोस्कर )

पुणे शहराच्या औद्योगिक वाढीने त्याचा चेहरा-मोहरा तर बदलला आहेच; पण ह्या पुराण्या शहराच्या सामाजिक रचनेतही बदल घडवून आणला आहे. शहरात नव्याने उदय पावलेल्या उद्योगपतींनी, व्यापाऱ्यांनी, कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि प्रतिष्ठित नागरिकांनी समाजजीवनाचे स्वरूपच बदलून टाकले आहे. औद्योगिक समाजातील जीवनाची एक नवी घडी त्यांनी निर्माण केली आहे. आता शहर डोळ्यांना सुख देणारे झाले असून तेथील सामाजिक वातावरण आनंददायक आणि काम करण्यास प्रोत्साहन देणारे झाले आहे. २५ वर्षांपूर्वी किर्लोस्करवाडी ह्या छोट्या गावात मी विद्यार्थी होतो. त्यावेळी माझ्या मित्रांकडून पुण्याच्या विद्वानांची कीर्ती माझ्या कानावर येत असे. तेथील विद्वानांनी विद्वत्तेची गाठलेली पायरी बाहेरच्या लोकांना गाठता येण्यासारखी नाही असे मी ऐकत असे. मग मी जेव्हा पुण्याचा रहिवासी झालो तेव्हा तेथील धांदलीच्या सामाजिक जीवनात गुरफटला गेलो आणि त्यात रमून गेलो. मला आश्चर्याचा एक सुखद धक्का बसला. अमेरिकेत मी घेतलेल्या एंजिनिअरिंगच्या शिक्षणाने माझी बौद्धिक पातळी उंचावली की पुण्यातील पंडितांनी त्यांची कमी केली हे मला समजेना. पण एवढे खरे की आमचे एकमेकांचे चांगलेच जमून गेले.

### आम्ही 'बाहेर'चे आता पुण्याचे झालो

पुण्यातील जीवनाची माझी वीस वर्षे चटकन् आणि मजेत गेली. तेथील सामाजिक जीवनात मी प्रवेश केला तो थोडासा भीतभीतच. त्यावेळी शहराच्या औद्योगिक जीवनाला नुकताच प्रारंभ होऊ पाहात होता. माझ्याप्रमाणेच इतर 'बाहेर'चे लोक दिसू लागले होते. खोसला, आगरवाल, फिरोदिआ, बजाज, वैद्य, कल्याणी, मोहिते, अशी अनेक नावे एकू येत होती. ह्या सर्व मंडळींना पुणे आवडले. त्यांचे कारखाने चालविण्यासाठी लागणारे शिक्षित लोकही तेथे होते. पुण्याची हवाही आरोग्य-कारक आणि उत्पादक काम आंग मोडून करण्यास अनुकूल अशी होती. काही उद्योगपती राज्य सरकारच्या धोरणामुळे मुंबई सोडून आलेले होते. काही का असेना पण आम्हां सर्वांना पुणे अतिथ्यशील वाटले आणि मग आम्ही 'बाहेरचे' होतो ही गोष्टच विसरून गेलो. बौद्धिक जीवनात आम्ही थोडीबहुत खळबळ उडवून दिली. तिला वादळ असे म्हणता न आले तरी लाटा म्हणण्यास हरकत नाही. एकदा एका प्रसिद्ध विद्वानाने आमच्याकडे काहीशा रागानेच पाहिले आणि ते म्हणाले "ह्या कारखान्यामुळे येथील घरांची भाडी वाढतील; हा एक उपद्रवच झाला आहे." स्थैर्य आणि बदल ह्यांमधील अंतर वाढविणारे काही लोक असतात. त्यांच्यातीलच ते एक होते. पण ते सर्वस्वी चूक होते असे मात्र नाही. आमचे कारखाने भरभराटू लागले आणि हजारो लोक कायमच्या व चांगल्या नोकऱ्यांच्या शोधा-साठी शहरात येऊ लागले. त्यांना मिळणाऱ्या पगारामुळे शहरा-तील जागांची भाडी खरोखरच वाढली. अर्थात ही भाडी देण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणी आली होती.

### नवे कारखाने व नवे वर्ग

नवे कारखाने आणि नवे सामाजिक वर्ग ह्यांची वाढ होऊ लागली. हा बदल मुकाट्याने होत असला तरी डोळ्यांना दिसणारा होता. विद्वान आणि एंजिनिअर लोक ह्यांची सरमिसळ होऊ लागली. हळुहळु अधिकाधिक एंजिनिअर्स सामाजिक जीवनात पदार्पण करू लागले आणि त्यांना मानाची स्थानेही मिळू लागली. काही वेळा तेढ उत्पन्न झाली. पण मोठासा स्फोट झाला नाही. कधी कधी कुरकुरीचे स्वर ऐकू येऊ लागले पण त्यांना कर्ण-कठोरता प्राप्त झाली नाही. पुण्याच्या समाजजीवनात नवनवे खेळ दिसू लागले; पण जुन्या लोकांनी त्यांना नावे ठेवली नाहीत. त्यांची मुलेच नव्या सामाजिक वर्गात दिसू लागली होती. ह्याचा अर्थ पुण्याची विद्वत्तेची व राजकारणाची परंपरा खंडित झाली असा मात्र नाही. सामाजिक बदलाची बाधा दोन्ही प्रकारच्या लोकांना झाली आहे असे मला वाटते. बुद्धिमंत वर्ग आपल्या मुलांना आपल्या पावलावर पाऊल टाकण्यास फारसे उत्तेजन देत नाही. उलट, उद्योगधंद्यात शिरण्यास त्यांना प्रोत्साहन देताना दिसतात. राजकारणी लोक आपले राजकारण करीत अथवा बोलत राहतातच; पण सामाजिक प्रगतीत भागीदारीही करू लागतात. उद्योगधंद्यांतून उत्पन्न मिळण्याची सोय करून ते आपला तळ मजबूत बनवितात. राजकारण हे काही म्हटले तरी अनिश्चित असते; शिवाय त्यासाठी खर्चही बराच येतो. तेव्हा एखादा व्यापारधंदा हाती ठेवून निश्चितपणा साधणे काही वाईट म्हणता येणार नाही. सामाजिक जीवनाची ही नवी घडी रेस्टॉरंटमध्ये, परिषदांच्या बैठकांत अगर धंदेवाईक संघटनांत उघडपणे दिसून येते.

### नव्या समाजाचे प्रतीक

डेक्कन जिमखान्याला पुण्यातील नवीन समाजाचे प्रतीक समजण्यास हरकत नाही असे मला वाटते. बुद्धिमंतांच्या ह्या बालेकिल्यात २० वर्षांपूर्वी बेकरीवाले आणि मांस विक्रेते ह्यांचे दिवाळे निघाले असते. आता त्यांची चलती आहे. ह्या नव्या जमान्यात टिळक अगर भागवत ह्यांसारखी नावे धारण करणारे लोक कुक्कुटपालनाचा धंदा करीत आहेत. पुण्यात आता ह्या व्यवसायात सरकार आणि खाजगी धंदेवाले ह्यांचे अभिमानास्पद सहकार्य दिसून येते. त्यांचे सहकार्य सर्वांनाच समाधानकारक ठरले. खाजगी कुकुटपालनाचा धंदा करणारे लोक लुसलुशित मांसाने मासलेल्या कोंबड्यांची पैदास करतात, तर

सरकारी मालकीच्या कारखान्यात त्या सोलून खाण्यासाठी साफ करण्यात येतात. बोरावके गलेलठ्ठ डुकरांची पैदास करतात आणि त्यांच्या मांसापासून तयार केलेले चविष्ट पदार्थ भोजनप्रिय माणसांना आनंद देतात. एके काळी ब्राह्मणांना मांसाहार वर्ज्य समजला जात होता. पण आता शेकडो ब्राह्मण मोठ्या चवीने मांसाहार करू लागले आहेत. सुखद वातावरण राखणारे एक भोजनगृह आता या भागात भरभराटीस आलेले आहे. आणखी नवीन दुकाने निघत आहेत आणि सर्वच जोरात चालत असल्याने त्यांच्या मालकांना संतोष होत आहे. हा बदल सर्व भागांत आणि समाजाच्या सर्व थरांत दिसून येत आहे. साधारण घरातून सुद्धा रेडिओ व फर्निचर दिसू लागले आहे. आधीच गर्दी असलेल्या रस्त्यातून स्कूटर्सची रांग लागत आहे. मोटारींच्या भोंग्यालाही त्या दाद देत नाहीशा झाल्या आहेत, आणि मोटारींची संख्याही वाढली आहे. हा फरक आमच्या कारखान्यांतून आणि कचेऱ्यांतून दिसू लागला आहे. मोटार, सायकली, स्कूटर्स आणि गाड्या उभ्या करण्यासाठी अधिक मोठी खुली जागा राखून ठेवावी लागत आहे.

### धावपळ करणारा कामगारवर्ग

ह्या सर्व धावपळीमागे नागरिकांची, कारखानदारांची आणि कामगारांची उत्साही वृत्ती दिसून येते. दूरदूरच्या कारखान्यांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर सायकलवरून जाणाऱ्या कामगारांची एकच गर्दी आढळून येते. रोज सकाळी कामाच्या जागी वेळेवर पोचण्यासाठी ते आपल्या सायकली जोराने दामटत असतात. काही लोक आपल्या स्कूटर्सवरून दौड करीत असतात. काही जण मोटारी हाकीत कचरीला येत असतात. विक्रेते गिऱ्हाइके मिळविण्यासाठी त्यांना वेळेवर गाठतात. व्यापारी आपली दुकाने उघडण्याच्या गडबडीत असतात. संध्याकाळ होऊन आपला माल झपाट्याने खपविण्याची वाट ते पाहात असतात. व्यापार–धंदा करून नफा कमावण्याची हीच वेळ असते. पण अजूनही पुण्याने भरभराटीचे शिखर गाठलेले नाही. ते गाठण्याची धडपड मात्र चालू आहे. उत्पादनाचा मूळ पाया भक्कम रीतीने भरून त्याचा विस्तार करण्याचे काम शेकडो तरुण उद्योगपती करीत आहेत. विद्यापीठात घेतलेल्या खर्चिक शिक्षणाचा उपयोग करून ते नाना प्रकारची विजेची उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स यंत्रे आणि सूक्ष्ममापन करणारा एंजिनिअरिंगचा माल बनवत आहेत. रोटरी क्लब, लायन्स क्लब, उत्पादकता मंडळ, ज्युनिअर चेंबर, मराठा चेंबर, आणि इतर अनेक संघटना ह्यांत तरुणांचे नवनवे चेहरे दिसू लागले आहेत. उद्योगधंद्यांतील वरिष्ठ नौकरवर्ग कॉलेजमधील अध्यापकांना आपला अनुभव सांगत आहेत. औद्योगिक संघटनांत काय अनुभव येण्याची अपेक्षा आहे त्याची कल्पना ते विद्यार्थ्यांना देत आहेत. आपल्या समाजाशी आणि अर्थव्यवस्थेशी संबंधित असणारी तत्त्वे आणि कल्पना ह्यांची तोंडओळख कॉलेजमधील प्राध्यापक कंपन्यांतील अधिकाऱ्यांना करून देत आहेत. ह्यामुळे व्यापार उदीमाच्या समाजातील स्थानाचा बोध होण्यास चांगली मदत होते. व्यापारी कंपन्या व संघटना आपआपल्या कामगारांचे आरोग्य सांभाळण्यासाठी डॉक्टर्स आणि इतर विशेषज्ञ नौकरीत ठेवतात. डॉक्टर्स लोक औद्योगिक जीवनातील आरोग्याच्या प्रश्नांचा अभ्यास करतात. आपला अनुभव ते आपल्या सहकाऱ्यांना व कारखानदारांना सांगतात. त्यामुळे कामाची परिस्थिती सुधारण्यास साह्य होते. निरनिराळ्या ज्ञानशाखांतील विद्यार्थ्यांना काम करता करताच शिकता यावे म्हणून कारखाने व व्यापारी पेढ्या शिष्यवृत्त्यासारखा मेहनताना देत असतात.

### तरुणांना उज्ज्वल भविष्यकाल

हुषार तरुण आपला भविष्यकाल उज्ज्वल करण्यासाठी झटत असतात आणि त्यांना धंद्याच्या पुढाऱ्यांकडून चांगली साद मिळत असते. कारखान्यातील मॅनेजरांनी फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, अरेबिक, इत्यादी परकीय भाषा शिकाव्या म्हणून त्यांना उत्तेजन देण्यात येते. त्यामुळे परदेशांच्या भाषा जाणणाऱ्या अनेक भाषाकोविदांना काम मिळाले आहे. एखाद्या व्यापारी संघटनेत ते परकीय भाषा शिकवीत असतात अगर खाजगी वर्ग चालवीत असतात. परदेशीय भाषा शिकविणाऱ्या अनेक संस्थांना व्यापारी संघटना प्रोत्साहन देतात. त्यामुळे उत्साहित होऊन ह्या संस्था आपल्या सोयीसवलतींचा विस्तार करीत आहेत. व्यावसायिक कामे करणाऱ्यांना पुण्याच्या औद्योगिक वाढीमुळे चांगला फायदा झाला आहे. शहरात आता ऑडिटर्स, कायदेशीर सल्लागार, कारभार संचालक सल्लागार, इत्यादी प्रकारच्या अनेक नव्या कंपन्या अस्तित्वात आल्या आहेत. अशा कंपन्यांत काम करणारे लोक अनेक प्रकारचे व्याप करीत असतात आणि सामाजिक संघटनांना नवीन दृष्टी देत असतात. व्यापारधंद्यातील खेळाची आवड असणारे लोक स्वतः क्रीडास्पर्धांत भाग घेतातच; पण त्याशिवाय खेळाच्या उत्तेजनासाठी पैसाही गोळा करतात. कधीकधी ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांही भरविण्यासाठी लागणारा पैसा उभारण्यास हातभार लावतात.

—' दि फिनॅन्शिअल एक्सप्रेस ' वरून

---

### बाटा कारखाना बंद : १२,००० कामगार बेकार

बाटा शू कंपनी प्रायव्हेट लि. ने आपला बाटानगर येथील कारखाना आणि कचेऱ्या बंद केल्या आहेत. "कंपनीच्या आवाक्याबाहेरची परिस्थिती" असे त्याचे कारण आहे. कामगारांनी बुद्धिपुरस्सर केलेल्या कृतीचे हे पर्यवसान असल्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देण्यास कंपनी बांधलेली नाही, अशी कंपनीने नोटीस लावली आहे. ह्यामुळे १२,००० कामगार बेकार झाले आहेत.

---

# जपानच्या दौऱ्यामुळे आत्मविश्वास वाढला



## 'मे. गद्रे बंधू'चे श्री. विनायकराव गद्रे ह्यांची उद्‌बोधक मुलाखत

निवेदक : श्री. विनायकराव म. गद्रे.
संयोजक : श्री. विवेक परदेशी

**प्रश्न :**—काळ–काम–वेगाची उदाहरणे शाळेत शिकत असताना होती. पण त्यांचा नि कारखानदारीचा संबंध कसा लावता हे ध्यानात येत नाही.

**उत्तर :**—त्याचे असे आहे की हे माझे विचार अनेक वर्षांच्या मननाने व चिंतनानंतर बनले असून माझ्या गेल्या वर्षीच्या जपानच्या प्रवासानंतर त्याला पुष्टीच मिळाली आहे. एक्स्पो दोनच दिवस पाहिले. बाकीचे १०–१२ दिवस मी आमच्या धंद्यातील हायड्रॉलिक प्रेसिंग, फोर्जिंग्ज, डाईज् करणारे कारखाने पाहण्यात गुंतलो होतो.

**प्रश्न :**—पण हे कसे जमवलेत इतक्या थोड्या वेळात ?

**उत्तर :**—आमचे जपानला जाणे ठरले ते एकदमच ! मी व माझे सहकारी श्री. गोरे यांनी जाण्याचा बेत केला आणि लगेच मुंबईच्या जपान एक्स्टर्नल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या कमिशनरना पत्र लिहून आमच्या धंद्यांतील जपानी कारखानदारांचे पत्ते व माहिती कळविण्याची विनंती केली नि त्यांचेकडून आलेल्या माहितीवरून जपानमधील कारखानदारांच्या भेटीच्या तारखा व वेळा नक्की करून घेतल्यामुळे आम्हांला कार्यक्रम अगोदर ठरविणे सोईचे झाले.

### जपानचे प्रथम दर्शन

आमच्या १०–१५ दिवसांच्या मुक्कामात विमानाने, बराचसा आगगाडीने व मोटरने प्रवास झाला; पण दैन्य, दारिद्र्य कोठेही दिसले नाही. जो तो आपापल्या कामात गर्कच दिसला. नवीन वसाहती पाहिल्या. हजारों घरे पाहिली. एकसारखी एक, कौलारू, स्वच्छ. पडझड झालेले, गिलावा पडलेले, एकही घर दिसले नाही.

**प्रश्न :**—हे असे कसे ?

**उत्तर :**—मला वाटते, या सर्व गोष्टी नियोजनपूर्वक झाल्या असाव्यात. एकाच लांबीरुंदीची, जाडीची, लाकडी घरे स्टँडर्डायझेशनमुळे सुबक व स्वस्त झाली. त्यात देशातील उपलब्ध सामग्री वापरण्याचा कटाक्ष असावा असेही दिसते. एवढेच कशाला ? कितीतरी पूल पाहिले. त्यांचे कठडे, रुंदी, वगैरे सारे एकाच प्रकारचे, मापाचे आढळले.

### जपानी माणूस

**प्रश्न :**—जपान पाहावयास गेलेल्या प्रवाशाचे त्या देशाबद्दल एकंदर काय मत होते ?

**उत्तर :**—मी माझे मत सांगतो. मला देश आवडला. माणसे आवडली. सरकारी यंत्रणा कार्यक्षम वाटली. माणसाचा देशाभिमान जाणवला. कष्ट, खूप मेहनत, हसतमुख मंडळी यांच्यापासून खूप खूप शिकण्यासारखे आहे. आपण निष्ठापूर्ण, योजनाबद्ध काम केले तर आपणही अशीच प्रगती करू शकू, त्यात अशक्य असे काही नाही, असा आत्मविश्वास वाटतो मला. माझ्या जपानच्या प्रवासातील हीच महत्त्वाची कमाई समजा हवी तर ! वर्षभर पाऊस पडत असल्याने सर्वत्र हिरवेगार प्रसन्न वाटते. जमिनीची जास्तीत जास्त मशागत करून उपयोगात आणण्याचे त्यांचे प्रयत्न डोळ्यात भरल्याखेरीज राहात नाहीत. दुसरा विशेष म्हणजे यांत्रिकीकरण. लहान लहान ट्रॅक्टर्स, अवजारे, यांचा सर्वत्र वापर. जनावरे दिसतच नाहीत.

देशाला कोळसा, लोखंड, कापूस, यांसारख्या आवश्यक कच्च्या मालाकरितां परदेशावर अवलंबून राहावे लागत असले तरी त्यांचा तुटवडा कोठेच भासला नाही. त्यांच्या वाटपाची योजना कार्यक्षम असली पाहिजे असे वारंवार मला वाटते.

### जपानी किमया

कच्च्या मालातून पक्का तयार माल करताना जास्तीत जास्त कौशल्य व बुद्धी वापरून त्यातून दर्जेदार व किंमतवान माल काढण्याचे त्यांचे कसब मला सर्वत्र दिसले. स्पेशलायझेशनमुळे ते शक्य झाले आहे. जपानी मोटारी, रेडियो, कॅमेरे, अमेरिकेसारख्या देशात वाढत्या प्रमाणात निर्गत होतात यामागील रहस्य हेच असावे असे मला वाटते.

अंगचे कसब दाखवून प्रगती करण्यास तेथे पुष्कळच वाव मिळतो असे दिसले. त्यामुळे कारागीर आणि गुणी सुशिक्षित तरुण जास्ती पगाराच्या नव्या कारखान्यात जाण्याच्या प्रवृत्तीचे आढळले.

काटकसर व बचत ही उत्पादनक्षेत्रातील प्रमुख अंगे आहेत. उत्पादनखर्च वाढू न देण्याबाबत कोशीस करणारे कामगार व चालक मला आढळले. कॉस्ट कॉन्शसनेस विशेषत्वाने जाणवला. कष्टाची, जागेची, मालाची, पैशांची काटकसर करण्याचा सतत प्रयत्न दिसला, विचार दिसला. त्याविना जगाची बाजारपेठ जिंकण्याची त्यांची धडपड यशस्वी होती ना ! श्रमाची-कामाची प्रतिष्ठा दिसली. काम सुसह्य व सुकर कसे होईल यांकडे

कटाक्षाने सतत लक्ष देण्याची त्यांची वृत्ती अनुकरणीय वाटते.

गिऱ्हाइकाला खूष करण्याचे त्यांचे प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत. पण ते लाड मात्र करीत नाहीत. मोती-जवाहर पाहण्यास आम्ही तीन बसेस मधून गेलो. तेथे १५ मिनिटे मुक्काम राहील अशी पूर्वसूचना आम्हांस देण्यात आली होती. एका बसचे प्रवासी वेळेवर आले. दुसऱ्या दोन बसमधील प्रवासी उशिराने आले अन् पाहातात तो त्यांच्या रिकाम्या बसेस परत गेल्या होत्या. त्या मंडळींना मुक्कामावर येण्यास उशीर तर झालाच पण खर्चाचेही झाले. या घटनेवर मागाहून चर्चा झाली. बसेसना अधिक वेळाची बोली नव्हती असे आम्हांस सांगण्यात आले.

पाहुणे-गिऱ्हाईक मंडळींशी व्यवहारापुरते स्नेहाचे संबंध ठेवावयाचे; पण अघळपघळपणा नाही असा माझा अनुभव आहे.

### जपानी राष्ट्रभाषा

जपानमध्ये सर्व व्यवहार जपानी भाषेत चाललेले आढळले. इंग्रजी अगर इतर परकी भाषा जाणणारे मोजके व थोडेच आढळले. डोळे उघडे ठेवून पाहिले व विचारशील व प्रयत्नशील असले तर भाषेचा अडसर आड येत नाही, असा माझा जपान-मधील प्रवासाचा अनुभव आहे.

**प्रश्न :**—म्हणजे जपानच्या या छोट्या सफरीचा आपल्याला पुष्कळच फायदा झाला म्हणावयाचा ?

**उत्तर :**— होय, खूपच. एक म्हणजे आत्मविश्वास वाढला. आपणही त्यांचेसारखे काहीतरी करून दाखवू असे वाटू लागले. मात्र सरकारी धोरण व यंत्रणा प्रगतीशील, पोषक व उपकारशील हवी. तथापि आपल्या आपण करण्यासारख्या गोष्टीही पुष्कळ आहेत.

### आधुनिक व्यवस्थापन

**प्रश्न :**—त्यांचे थोडे दिग्दर्शक कराल का ?

**उत्तर :** का नाही ? अवश्य. माझा कारखाना सांगलीला. आता वीस एक वर्षे होत आली. माझे भांडवल म्हणजे अंगी असलेली कसब. शून्यातून सुरवात झाली. आज १००-१५० कामगार कामाला आहेत. १०-१२ लाख रुपायांचा वर्षाला व्यवहार होतो. आता २-३ नवीन कारखाने सुरू केले आहेत. आर्थिक अडचणी, कामगाराचे प्रश्न, धंद्यांतील चढ-उतार पाहात आलो आहे. गेल्या ४-५ वर्षांपासून धंद्याचे स्वरूप झपाट्याने पालटत आहे. पुढील ५-१० वर्षांत काय बदल होणार याचा अंदाज बांधण्याचा माझा सतत प्रयत्न आहे. कामगार प्रश्नाबरोबरच व्यवस्थापनाचे प्रश्न मला महत्त्वाचे वाटतात. आपल्याकडे त्यात खूप सुधारणा व्हावयास पाहिजे असे मला नेहमी वाटते. धंद्यांतील प्रश्नांचा सांगोपांग विचार करणारे, अधिक जबाबदारी घेणारे व्यवस्थापक, अधिकारी मंडळी कशी तयार होतील हा माझ्या पुढील महत्त्वाचा प्रश्न आहे.

**प्रश्न :**—आपला विचार अगदी योग्य आहे. विकसनशील देशात, विशेषतः लघू व मध्यम उद्योग धंद्यांपुढील ही महत्त्वाची समस्या आहे खरी.

---


## दि पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणे

ठेवीदारांचे हित व शेतकऱ्यांची सोय या दोहोंचा समन्वय साधणारी सहकारी बँक

| बँकेच्या प्रगतीचे बोलके आकडे | | लाखात |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | ८७.५१ |
| निधी | रु. | ६१.६१ |
| ठेवी | रु. | ७४६.५३ |
| खेळते भांडवल | रु. | १०६४.८२ |

बँकेच्या एकूण शाखा ४१ असून मुख्य कचेरी व ७ शाखांत सुरक्षित कप्प्यांची सोय आहे.

दि. ना. कायदे,
बी. ए. (ऑनर्स), एच्. डी. सी.,
सी. ए. आय्. आय् बी.
कार्यकारी संचालक

साहेबराव मा. सातकर,
एम्. एल् ए.
अध्यक्ष

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३०

—प्रगतीची यशस्वी वाटचाल—

ऑडिट 'अ' वर्गामध्ये सतत असणारी पुण्यातील एक अग्रेसर सहकारी बँक

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अधिकृत भाग भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) | वसूल झालेले भांडवल | रु. | ४,७६,००० |
| (३) | खेळते भांडवल | रु. | ८२,८३,००० |
| (४) | गंगाजळी | रु. | २,५५,००० |
| (५) | ठेवी | रु. | ६५,२८,००० |
| (६) | कर्जे | रु. | ५१,४५,००० |

(अ) ५ ते ८॥ टक्के दराने ठेवी स्वीकारल्या जातात.
(ब) सभासदांस व नाममात्र सभासदांस जामिनकी, भाडेकरार, नजरगहाण व मालतारणावर कर्जे मिळण्याची सोय.
(क) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

आजच समक्ष भेटा

व. गं. बर्वे व्यवस्थापक

मुख्य कार्यालय :
कॉसमॉस बँक बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणे ३०
दूरध्वनी : ५६२८३

शाखा :
४८९/अ/२ पर्वती,
पर्वती दर्शन, पुणे ९
दूरध्वनी : २७३८६

## बांगला देशाची सविस्तर माहिती

नव्याने स्थापन होणाऱ्या बांगला देशाचे क्षेत्रफळ १,४२,७९७ चौ. किलोमीटर असून पश्चिम पाकिस्तानच्या क्षेत्रफळा-पेक्षा (७,९४,६३२ चौ. किलोमीटर) ते खूपच कमी आहे. परंतु लोकसंख्येच्या बाबतीत प्रकार उलट आहे. १९६१ च्या शिरणगतीप्रमाणे प. पाकिस्तानची लोकसंख्या ४ कोटी २८ लक्ष होती, तर बांगला देशाची (पू. पाकिस्तानची) ५ कोटी ८ लक्ष होती. बांगला देशाची आजची लोकसंख्या ७ कोटी असावी. बांगला देशात फाळणीपूर्व पूर्व बंगालचा आणि आसामच्या सिल्हेट भागाचा समावेश होतो.

बांगला देश पाकिस्तानचा भाग असतेवेळी त्याचे ४ विभाग आणि १७ जिल्हे होते. मुख्य शहर डाक्का हे असून त्याची लोकसंख्या १९६१ मध्ये ५,५६,७१२ होती. चित्तगाव आणि चालना ही बांगला देशाची मुख्य बंदरे आहेत. पाकिस्तानी फौजांनी डाक्का विद्यापीठ उद्ध्वस्त केले आहे. राजशाही आणि चित्तगाव ही इतर दोन विद्यापीठे होत.

बांगला देश शेतीप्रधान असून ८२% जनतेची गुजराण शेतीवर होते. तांदूळ हे मुख्य पीक आहे. इतर प्रमुख पिकात ऊस, गहू, आणि चहा ह्यांचा समावेश होतो. बांगला देशात तागाच्या जगातील एकूण उत्पादनाच्या ८०% उत्पादन होते. बांगला देशाच्या किनाऱ्याजवळ तेल सापडण्याची निश्चिती आहे. १९६६-६७ मध्ये बांगला देशात एकूण १,०९८ कारखाने होते आणि त्यात २,०१,००० कामगार होते. कारखान्यात २७ कापडाच्या गिरण्या, ७ साखरकारखाने, १५ आगपेट्यांचे कारखाने, ७ काचकारखाने, १७८ होजिअरिचे कारखाने, २९ तागाच्या गिरण्या, एक कागदाची गिरणी आणि एक सिमेंटचा कारखाना, ह्यांचा समावेश होता.

गंगा, ब्रह्मपुत्रा, पद्मा आणि मेघना ह्या नद्यातून वाफेवर चालणाऱ्या बोटीमधून, जेथे रेल्वेची सोय नाही, अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते.

**आर्थिक मदतीमध्ये पक्षपात (कोटी रु.)**

| मदत | पूर्व पाकिस्तान | प. पाकिस्तान |
|---|---|---|
| आर्थिक साहाय्य | १२६ | १,००० |
| लष्करी खर्च | १० | ४६५ |
| भांडवली खर्च | ६२ | २१० |
| शैक्षणिक अनुदाने | २४ | १५३ |
| परदेशी मदत | १५ | ७२ |

**भाषावार लोकसंख्या**

| भाषा | भाषिकांचे लोकसंख्येशी प्रमाण % |
|---|---|
| बंगाली | ५४·५ |
| पंजाबी | २८·४ |
| पुश्तु | ७·४ |
| उर्दू | ७·२ |
| सिंधी | ५·८ |
| इंग्रजी | १·८ |

## पश्चिम पाकिस्तानांत असंतोष उफाळणे अवघड

पूर्व बंगालमध्ये निवडून आलेल्या आवामी लीगच्या प्रतिनिधींच्या हाती राजकीय सत्ता देण्याऐवजी पाकिस्तानच्या लष्करी हुकूम-शाहीने तेथे बंगाल्यांचे शिरकाण सुरू केले. ह्या हत्याकांडाला आता महिन्यापेक्षा अधिक काळ लोटला आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत पूर्व बंगालला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे तेथील परिस्थितीचा धक्का पश्चिम पाकिस्तानला बसणे अपरिहार्य असले तरी त्यामुळे तेथे असंतोष लवकर उफाळून येण्याची शक्यता नाही. पूर्व पाकिस्तानातून माल निर्यात करून पाकिस्तानला परदेशीय चलनाची मोठी प्राप्ती होत असे. परंतु तिचा उपयोग मुख्यत: पश्चिम पाकिस्तानच्या विकासा-साठी करण्यात येत असे. प. पाकिस्तानात तयार होणारा माल पूर्व पाकिस्तानच्या संरक्षित बाजारपेठेत भरमसाठ महाग विकला जात असे. अशी ही पिळवणूक गेली २० वर्षे चालू आहे. पश्चिम पाकिस्तानातील मजूर वर्ग पूर्व बंगालमधील हत्येविरुद्ध उठण्याची फारशी शक्यता नजिकच्या कालात तरी नाही. कारण, पूर्व बंगालच्या पिळवणुकीमुळे होणाऱ्या लाभांत ह्या वर्गाचाही थोडाबहुत फायदा होताच. म्हणजे अखंडित भारत ब्रिटिश अमलाखाली असताना जशी परिस्थिती होती तशीच काहीशी ही परिस्थिती आहे. भारताचे आर्थिक शोषण करून ब्रिटनमधील मजूरवर्गाला थोडेफार समाधानी ठेवणे ब्रिटनला शक्य होत असे. ह्याचा अर्थ असा की पूर्व पाकिस्तानला वसाहतीच्या दर्जाने वागविणे प. पाकिस्तानातील कामगार वर्गाच्याही निदान तात्पुरत्या हिताचे आहे. तेव्हा पश्चिम पाकिस्तानात असंतोष पेटून त्यामुळे पूर्व बंगालमधील परिस्थितीला वेगळे वळण लागण्याचा संभव फारच अल्प आहे.

## बरोडा बँक-टाटा केमिकल्स विलिनीकरण

बँक ऑफ बरोडा लि. च्या टाटा केमिकल्स लि. शी होणाऱ्या विलिनीकरणास दोन्ही कंपन्यांच्या संचालक मंडळांनी मान्यता दिली आहे. विलिनीकरणाच्या योजनेनुसार बँकेचे ५० रु. पेड असलेले ५ भाग धारण करणारास टाटा केमिकल्सचे प्रत्येकी १० रु. चे ९ इक्विटी शेअर्स आणि प्रत्येकी १०० रु. ची ८% दराची पाच डिबेंचर्स मिळतील. विलिनीकरणानंतर जुन्या भागधारकांना डिव्हिडंड आणि व्याज मिळून जो मोबदला मिळेल, तो त्यांना विलिनीकरणापूर्वी मिळत असलेल्या डिव्हिडंडपेक्षा अधिक भरेल. ज्यांना विलिनीकरणाच्या योजनेत सहभागी व्हावयाचे नसेल, त्यांना त्यांच्या प्रत्येक शेअरचे १३५ रु. रोख मिळतील. बँकेच्या भागाची बाजारातील आजची किंमत सुमारे १२४ रु. आहे.

## उद्योगधंद्यासाठी प्रोत्साहित करणारे भारतातील पहिले राज्य : महाराष्ट्र

श्री. राजारामबापू पाटील

( उद्योग-वीज-मुद्रणालये मंत्री, महाराष्ट्रराज्य )

गेल्या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्राची चेहरेपट्टी बदलली आहे. मराठी माणसे आता उद्योगाकडे वळली आहेत नवीन तरूण वर्ग या क्षेत्रात उत्साहाने भाग घेताना दिसत आहे. महाराष्ट्रातील सामाजित जीवनात यामुळे एक महत्त्वाचा बदल होत आहे. महाराष्ट्रात औद्योगिक प्रगती वेगाने होण्यासाठी, जागा, पाणी, वीज यांची उपलब्धता आणि दळणवळणाची साधने निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने १ ऑगस्ट १९६२ ला महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापन केली.

### २० औद्योगिक क्षेत्रांची निर्मिती

या महामंडळाने आतापर्यंत २९ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून त्यांसाठी १२,४०० हेक्टर्स ( ३०,५६६ एकर ) जमीन संपादन करण्याचा संकल्प केला असून या क्षेत्रांपैकी एकूण ७,४०० हेक्टर्स ( १८,२०० एकर ) जमीन महामंडळाच्या ताब्यात आली आहे. या क्षेत्रांचा विकास करण्यासाठी महामंडळाने सुमारे साडे सहा कोटी रुपये खर्च केले आहेत. औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योग, मध्यम उद्योग आणि मोठे उद्योग अशा सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यांना जागा देण्यात येते. निर-निराळ्या औद्योगिक क्षेत्रांत महामंडळाने एकूण २,९८६ प्लॉटस् विकसित केले असून त्यांपैकी २,००४ प्लॉटस् प्रत्यक्ष वाटप करण्यात आले आहेत. महामंडळाच्या क्षेत्रात येणाऱ्या उद्योग-धंद्यांचे स्थूलमानाने दोन विभाग पडतात— ( १ ) अभियांत्रिकी उद्योग व ( २ ) रासायनिक उद्योग. अभियांत्रिकी उद्योगधंदे सर्वसाधारणपणे पाहिजे त्या ठिकाणी काढता येतात. परंतु रासायनिक उद्योगधंदे मात्र दूषित पाणी जवळपासच्या खाडीत अथवा नाल्यात सोडता येईल अशाच ठिकाणी काढता येतात. या प्रकारचे उद्योगधंदे महामंडळाच्या ठाणे-बेलापूर पट्टीत, डोंबिवली, अंबरनाथ, तळोजा, रोहा आणि तारापूर क्षेत्रांत काढता येतील. ठाणे बेलापूर पट्टीतील पेट्रो-केमिकल विभागात सबंध देशातील सर्वांत मोठा असा पेट्रो-केमिकल उद्योगधंद्यांचा गट महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या सोईमुळे निर्माण झाला आहे.

औद्योगिक क्षेत्रातील प्लॉटस्च्या किमती अशा रीतीने ठरविण्यात आल्या आहेत की, त्या विकसनशील भागाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठराव्यात विकसित भागात महामंडळ प्लॉटस् बाजारभावाने विकते तर अविकसित भागात ते प्लॉटस् नाममात्र किमतीने अथवा सवलतीच्या भाड्याने देते. हे सवलतीचे भाडे म्हणजे पहिली दोन वर्षे प्लॉटसवर मुळीच भाडे घेण्यात येत नाही. पुढील तीन वर्षे केवळ अर्धे भाडे घेण्यात येते व सहाव्या वर्षापासून पूर्ण भाडे घेण्यात येते.

### १८० कोटी रुपयांची गुंतवणूक

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात जवळजवळ ६०० कारखाने सुरू झाले असून त्यामध्ये अंदाजे १८० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक झाली आहे व त्यामध्ये जवळजवळ ३५ हजारांचेवर कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात उद्योगधंद्यास लागणाऱ्या सर्व सोयींनी युक्त असे किमान एक तरी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. आतापर्यंत २२ जिल्ह्यांत ही क्षेत्रे निर्माण झाली असून राहिलेल्या जिल्ह्यांत चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक क्षेत्रे निर्माण होतील.

उद्योगाचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागात उद्योगधंदे नेऊन औद्योगिक प्रगतीमधील असमतोल कमी करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे.

---

### सर्वांत मोठी कागदाची गिरणी

ओरिसा राज्यात लवकरच एक कागदाचा कारखाना काढण्यात येणार आहे. खाजगी मालकीच्या विभागातील हा कारखाना कोरापुर जिल्ह्यात निघणारा आहे. त्याच्या उभारण्यासाठी ३० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. देशातील हा सर्वांत मोठा कागदाचा कारखाना होईल आणि त्यापासून दरसाल १ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल.


## दि बँक ऑफ कराड लि., कराड

( शेड्युल्ड बँक )

रजिस्टर्ड ऑफिस :—१५, रविवार पेठ, कराड

शाखा :—मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटे, कोल्हापूर, मलकापूर व भोर.

**मुदत ठेवींवरील व्याजाचे दि. ११–१–१९७१ पासून वाढलेले दर**

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव | ४½ टक्के |
| १ वर्ष ते २ वर्षांपर्यंत | ६½ टक्के |
| २ वर्षांपेक्षा जास्त ते ३ वर्षांअखेर | ७ टक्के |
| ३ वर्षांपेक्षा जास्त ते ५ वर्षांअखेर | ७½ टक्के |
| ५ वर्षांपेक्षा जास्त | ७¾ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

इस्लामपूर व तासगाव येथे सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

म. वि. खंडकर

चेअरमन

## अवघड आणि अप्रिय निर्णय आता शक्य

### भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल सावध आशावाद

लंडनमधील फिनॅन्शिअल टाइम्स ह्या पत्राने हिंदच्या अर्थव्यवस्थेबद्दल आशावादी लेख प्रसिद्ध केला आहे. लेखात असे प्रतिपादन करण्यात आले आहे की आर्थिक भरभराटीच्या मार्गावर पहिले पाऊल टाकण्यासाठी जी अनुकूल परिस्थिती असावी लागते ती सर्व आता भारतात दिसून येत आहे. आर्थिक प्रगती होण्यासाठी लागणाऱ्या बळकट शेतीव्यवसायाचा पाया घालण्यात आला आहे. औद्योगिक उत्पादनही वाढू लागले आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशाची सूत्रे स्थिर अशा सरकारच्या हाती आलेली आहेत. त्यामुळे जलद प्रगती करण्याच्या उंबरठ्यावर आता भारताने पाऊल ठेवले आहे. मात्र हे घडून येण्यासाठी सरकारने काहीसे अवघड आणि प्रसंगी लोकांना न आवडणारे निर्णय घेण्याची तयारी दाखविली पाहिजे. अशा अवघड निर्णयात उद्योगधंद्यावरील डोईजड कर कमी करण्याचा निर्णय असला पाहिजे. असा निर्णय न घेतल्यास उद्योगधंद्यांना उत्पादन वाढविण्याची प्रेरणा मिळणार नाही. त्याचप्रमाणे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडेही मोर्चा वळवावा लागणार आहे. अर्थमंत्री चव्हाण ह्यांनी आपल्या मध्यंतर अंदाजपत्रकावरील भाषणात उत्पन्न वाढविण्याच्या प्रयत्नाचा निर्देश केला आहे. उत्पन्न मिळविण्याचे मार्ग अधिक व्यापक करण्याचे प्रयत्न सरकारला करावेच लागणार आहेत. ते वाढविण्याचे जुने मार्ग चोखाळून आता फारसा उपयोग होणार नाही ह्याची जाणीव त्यांना आहे. त्यासाठी अधिक सखोल योजना आखण्यात आली पाहिजे.

त्याचप्रमाणे आणखी एक गोष्ट सरकारच्या ध्यानात आलेली दिसते. निवडणूक होण्यापूर्वी सरकार वेतनवृद्धीच्या मागण्यांना मान तुकावत असे. असे करण्याने सरकारच्या तिजोरीवर अतिशय ताण पडतो. शिवाय वेतनात करण्यात आलेल्या वृद्धीमुळे किमती आणखीच चढतात व वेतनवृद्धी खाऊन टाकतात ह्याचा अनुभव सरकारला चांगला आलेला आहे. म्हणून चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी साधनसामग्री अधिक प्रमाणात मिळविणे आणि वेतनवृद्धीला आळा घालणे ही दोन प्रमुख कामे सरकारला करावी लागणार आहेत. त्याचबरोबर औद्योगिक उत्पादनात वाढ करणे आणि निर्यात वाढविणे ह्याबद्दलही जोराचे प्रयत्न करावे लागणार आहेत. औद्योगिक उत्पादन वाढण्यासाठी आणि निर्यात अधिक करण्यासाठी काही तरी प्रलोभन पाहिजे ह्याची जाणीव दिसून येत आहे. ह्याबाबतीत केवळ तात्त्विक सिद्धांताची कास धरून राहण्याची मनोवृत्ती दिसून येत नाही. अर्थात ह्याचा अर्थ असा नाही की देशामधील प्रस्थापित बड्या उद्योगधंद्यांनी मन मानेल तसे वागण्याचा परवाना मिळणार आहे. त्यांना सरकारी धोरणांचा पथ्ये पाळावीच लागतील. छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण चालू ठेवण्यात आलेच पाहिजे. तथापि, एक गोष्ट खरी की सरकार आणि उद्योगपती ह्यांच्यात आता विचारांची देवाणघेवाण होऊ लागली आहे. उद्योगपतींपैकी पुष्कळांना एका गोष्टीबद्दल समाधान वाटत आहे. निर्णय घेण्यास समर्थ असे सरकार अधिकारावर आले ही ती होय. श्रीमती गांधी ह्यांचे सरकार आर्थिक समस्यांकडे व्यावहारिक दृष्टिकोनातून बघत असल्याबद्दल त्यांना समाधान वाटत आहे.

---

## दि. बँक ऑफ कराड लि., कराड चा

### रौप्यमहोत्सव

प्रगतीकडे झपाट्याने वाटचाल करणारी व जनतेच्या अंतःकरणात आदराचे स्थान निर्माण करणाऱ्या कराड येथील दि बँक ऑफ कराड लि. या संस्थेला दि. २७ मार्च १९७१ रोजी गुढी पाडव्याच्या दिवशी २५ वर्षे पुरी झाली. ही बँक २६ व्या वर्षात नव्या उत्साहाने नि नव्या जोमाने पदार्पण करीत आहे. या शुभ व मंगल प्रसंगी बँकेच्या इमारतीत सकाळी होमहवनादी धार्मिक कार्यक्रम पार पडला. बँकेचे हितचिंतक, सभासद आणि कर्मचारी आदी सेवक मंडळी यांचा आनंद ओसंडून जात होता.

बँकेच्या संचालक मंडळावरील सर्वश्री नानासाहेब बुधकर, वकील, पलूसचे माधवराव परांजपे, डॉ. व्ही. जी. देशपांडे, दादासाहेब देशपांडे आदी मंडळी उपस्थित होती.

या बँकेची स्थापना १२ मार्च १९४६ रोजी झाली व तिच्या प्रत्यक्ष कामास ३ एप्रिल १९४६ रोजी गुढी पाडव्याच्या शुभदिनी सुरवात झाली. गुढी पाडवा हा बँकेच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा व आनंदाचा दिवस समजला जातो.

२५ वर्षापूर्वी गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सर्वश्री कै. नानासाहेब देशपांडे, दे. भ. कै. पांडुअण्णा शिराळकर, धनी दादासाहेब वेलणकर आदी बँक व्यवसायातील प्रमुख मंडळींनी बँक स्थापना करण्याच्या कामी पुढाकार घेतला होता. सुरवातीस बँकेला सर्वश्री म. वि. खडंकर, विठ्ठलराव कुलकर्णी हे सेवक म्हणून लाभले.

मुंबई, पुणे आदी प्रमुख शहरी शाखा असून १० शाखांमधून १०० च्या वर सेवक काम करीत आहेत.

बँकेने शेतकऱ्यांना व लघू उद्योगधंद्याना भरीव आर्थिक साहाय्य केले आहे. त्यामुळेच दि बँक ऑफ कराड लि.ने जनतेचा विश्वास संपादन केलेला आहे. बँकेचा रौप्य महोत्सव लौकरच मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात यावयाचा आहे.


---

### दिल्ली सर्वात दाट वस्तीचे शहर

नुकत्याच करण्यात आलेल्या जनगणनेच्या आकड्यावरून असे दिसून आले आहे की दिल्लीची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्येच्या वाढीचा राष्ट्रीय वेग दहा वर्षांच्या कालासाठी म्हणजे १९६१-७१ ह्या दशकात २४·५७ टक्के होता, तर दिल्लीतील लोकसंख्येच्या वाढीचा वेग ५२·१६ टक्के इतका म्हणजे दुपटीपेक्षाही अधिक आहे. अर्थातच दिल्लीत माणसांची गर्दीही फार झाली आहे. दिल्ली शहरात दर चौरस किलोमीटर जागेत ९,०८० लोक राहात आहेत. शहराच्या कॉर्पोरेशनच्या क्षेत्रात इतक्या दाटीवाटीने लोकवस्ती करून आहेत. एकंदरीने शहरांची लोकसंख्या वाढण्याकडे कल दिसून येतो. उलटपक्षी ग्रामीण भागांतील लोकसंख्येचे दर चौरस किलोमीटर-मागे प्रमाण ३९९ लोक इतके पडते.

### जपानच्या साह्याने पॉवर टिलर

जपानची तांत्रिक मदत घेऊन भारतात प्रथमच १० अश्व-शक्तीचा पॉवर टिलर बनविण्यात आला आहे. अखिल भारतीय शेतकी संशोधन संघटनेने त्याचे प्रात्यक्षिक नुकतेच दाखविले. हे अवजार जमीन नांगरणे, पाणी उपसणे, ओझे ओढणे, ही व इतर अनेक प्रकारची शेतीची कामे करू शकते. एक एकर जमीन नांगरण्यासाठी यंत्राला फक्त १७ रुपये खर्च येतो. पॉवर टिलरची किंमत बेताची असून तो वापरण्यासही सोपा आहे. १० ते १५ एकर भातजमिनीच्या मशागतीसाठी हे यंत्र फार उपयोगी पडणारे आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस अशा प्रकारच्या नांगरांची मागणी ६० हजारांच्या घरात जाईल असा अंदाज आहे. सध्या देशात फक्त ५ हजार पॉवर टिलर्स असून ते बहुतेक दक्षिण भारतात भातशेतीसाठी वापरण्यात येत आहेत.



**तापल्या**
**लोखंडावर**
**घाव घाला...**


या म्हणीची व्याप्ती फार मोठी आहे. पैशाचेच उदाहरण घ्या. नुसता मुबलक पैसा असून उपयोगी नाहीं. उत्पादनक्षम उद्योग-धंद्याची यशस्वीता पैशाची वेळेवर तरतूद होण्यावर अवलंबून आहे. तसेच लघुउद्योगधंदा करणारास अगर स्वतःचा धंदा असणाऱ्या कारागीरास आपल्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच तज्ज्ञांकडून आर्थिक बाबीसंबंधीहि कळकळीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. याची जाणीव होते.


यांसाठीं बँक ऑफ इंडीयाच्या नजिकच्या शाखेत विचारणा का करीत नाहीं ?

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/127 BMAR


---



**इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.**

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ तार : Vijayplow

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों मे हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल आता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )